# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 16/09/2023 (शनिवार) सायंकाळ

---

## विनयभंग करणाऱ्या आरोपीतांना कोर्टातुन शिक्षा

पो.स्टे. काटोल :— फिर्यादी/पिडीता यांच्या रिपोर्ट वरुन पो.स्टे. काटोल येथे अप. क्र. १२९/२०१३ कलम ३५४ (अ) (१), ५०६ भा.द.वी. सहकलम ८ पोक्सो कायद्यान्वये गुन्हा नोंद झालेला होता.

यातील पिडीता/फिर्यादी व आरोपी हे एकाच गावात राहत असुन यातील पिडीता ही तिचे मोहल्यातील राहणाऱ्या आरोपी **श्रावण रमेश बलांसे वय २५ वर्ष** याचे घरी तिचे मोठया भावाचे पॅन्ट आणण्यासाठी गेली असता **आरोपी मंगेश धनराज वरखडे वय २३ वर्ष दोन्ही रा. अर्जुन नगर काटोल** हा पण तेथेच हजर होता. दोन्ही आरोपीतांनी संगनमत करून पिडीताचे हात पकडले व फिर्यादीचा विनयभंग केला. तेव्हा पिडीता ही आरोपीतांचे हाताला झटका मारून घरी पळुण आली. त्यानंतर पुन्हा आरोपीतांनी दिनांक ३०/०६/२०१३ चे २०/०० वा. रोजी फिर्यादीच्या घरी जावुन पोलीस स्टेशनला रिपोर्ट दिली तर तुला जिवाने मारून टाकीन अशी धमकी दिली.

सदर प्रकरणाचे तपास पोलीस निरीक्षक पंकज जाधव यांनी करून सदर प्रकरण न्याय प्रविष्ठाकरीता मा. अतिरीक्त सत्र न्यायाधीश श्री. जयस्वाल सो. कोर्टमध्ये सादर केले. आज दिनांक १६/०९/२०२३ रोजी मा. अतिरीक्त सत्र न्यायाधीश श्री. जयस्वाल सो. यांनी वरील दोन्ही आरोपीतांना कलम ३५४ (अ) भादंवी मध्ये १ वर्ष सश्रम कारावास व ५००/—रू दंड. दंड न भरल्यास १५ दिवस साधी कैद. तसेच कलम ५०६, ३४ भादंवी मध्ये ०६ महिणे सश्रम कारावास व २००/—रू दंड. दंड न भरल्यास ०७ दिवस साधी कैद अशी शिक्षा ठोठावली आहे.

सरकारचे वतीने एपीपी खापर्डे मॅडम यांनी काम पाहीले. कोर्ट कामात पैरवी अंमलदार म्हणुन पोशि ब. नं. ४०५ प्रमोद कोहळे पो.स्टे काटोल यांनी मदत केली आहे.

## जबर दुखापत

पो.स्टे. कळमेश्वर :— अंतर्गत ०१ किमी अंतरावर ईंदीरा नगर झोपडपट्टी कळमेश्वर येथे दिनांक १२/०९/२०२३ चे १४.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे— प्रविण उमाकांत राउत, वय ३६ वर्ष, रा. वैशाली नगर कळमेश्वर हा कामानिमित्य आरोपी क्र. ०१) नामे— सलमान फिरोज शाह याचे घरी गेला असता आरोपी क्र. ०१) ची बहिण नामे— आरजु हिचे सोबत बोलुन घराचे बाहेर येत असतांना आरोपी हा दारात भेटला त्यास वाटले की, त्याच्या बहिणीची छेडछाड केलेली आहे. यावरून आरडा ओरडा केल्याने मोहल्ल्यातील लोक जमा झालेत आरोपी क्र. २) कैफ सय्यद ३) उमेश रेवतकर तीन्ही रा. ईंदीरा नगर झोपडपट्टी कळमेश्वर यांनी मिळुन फिर्यादीला काठीने व लात भुक्क्याने पाठीवर, हातावर, पोटावर व डोक्याचे मागे बाजुस व डाव्या व उजव्या डोक्याचे भुवईवर मारहाण करून जखमी केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. कळमेश्वर येथे आरोपीतांविरुध्द कलम ३२६, ३४ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोहवा/१६५९ गंगाधर ठाकरे हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर